**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. आनंदराव गोपाळ लोखंडे
मु.पो. . ताकारी रेल्वे स्टेशन, ता.वाळवा,
जि. सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक भूमि अभिलेख,
सांगली, जि. सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक
भूमि अभिलेख, इस्लामपूर, वाळवा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.८.२००८ |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. आनंदराव गोपाळ लोखंडे<br>मु.पाक, ताकारी रेल्वे स्टेशन, ता.वाळवा, जि. सांगली<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक भूमि अभिलेख,<br>सांगली, जि. सांगली श्री. व्ही. एन. परदेशी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक<br>भूमि अभिलेख, इस्लामपूर, वाळवा, जि. सांगली श्री. वि.ल. भिंगारे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत प्रत जोडली आहे.

## विवेचन

फेरचौकशीसाठी आलेल्या प्रकरणाचा निर्णय दीड वर्ष होऊनही न दिल्याच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती वेळेत मिळाली नाही. त्यासाठी तीन महिन्यांच्या कालावधीची मागणी केली. अशी मुदतवाढ देता येत नसल्याचे लेखी कळविल्यानंतरही विलंबाने माहिती दिली. तसेच फेरचौकशी प्रकरणी अंतिम निर्णय चुकीचा व बेकायदेशीर दिला, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. आनंदराव गोपाळ लोखंडे यांनी केले.

श्री. लोखंडे यांनी निर्णय प्रक्रियेत असलेल्या प्रकरणांची माहिती मागितली होती, म्हणून तीन महिने मुदतवाढ मागितली. या मुदतीत निर्णय होऊन त्यांना कळविले. काही माहिती रजिस्टर स्वरुपात असल्यामुळे शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्यास कळविले. परंतु त्यांनी त्याबाबत अर्ज न केल्यामुळे माहिती पुरविली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, इस्लामपूर यांनी केले. श्री. लोखंडे यांनी फेरचौकशी पूर्ण करण्याबाबतचे नियम काय आहेत? अंतिम निर्णय अद्याप का झाले नाहीत? अशा स्वरुपाची विचारणा केली आहे. त्या सर्व बाबींची उत्तरे देण्यात आली आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली यांनी केले.

तीन महिने मुदतवाढ घेतल्यानंतर माहितीसाठी शुल्क आकारण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य नाही. फेरचौकशी प्रकरणातील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपीलकर्त्याला नि:शुल्क द्याव्यात. प्रलंबित फेरचौकशी प्रकरणांबाबतची विस्तृत माहिती अपीलकर्त्याने मागितली आहे. संबंधित रजिस्टर त्यांना दाखवून त्यातील १०० पृष्ठांपर्यंतची माहिती नि:शुल्क दयावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र त्यानुसार आपल्याला माहिती दिली गेली नसल्याची तक्रार श्री. लोखंडे यांनी दि.७.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी याबाबतचा खुलासा करणे

आवश्यक आहे. मात्र फेरचौकशी प्रकरणातील निर्णय व कारवाई, योग्य की अयोग्य, कायदेशीर की बेकायदेशीर याचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचा निर्णय पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तारीखवार व संबंधित कागदपत्रांच्या प्रतीसह अहवाल जन माहिती अधिकारी श्री. व्ही. एल. भिंगारे व अपिलीय प्राधिकारी, सांगली श्री. व्ही. एन.परदेशी यांनी दि. १८.१०.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५ .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. गणेश ह. टिंगरे
रा. स.नं.२४/१, दत्तनगर, भरत गार्डन ढाबा जवळ,
धानोरी, पुणे - ४११ ०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (पथ विभाग), उत्तरवादी
विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
(पथ विभाग), विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७३४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (पथ विभाग),
विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. अनिरूध्द पावस्कर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
(पथ विभाग), विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे
सौ. हर्षदा वि. शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत प्रत जोडली आहे. |
| --- | --- |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

डी.पी. रस्त्याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. गणेश ह. टिंगरे यांनी पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडे मागितली होती व प्रथम अपिलही पथ विभागाकडे केले होते. सदरचा विषय हा विकास योजना विभागाशी संबंधित असल्यामुळे पथ विभागाकडून अर्ज व अपील त्यांच्याकडे वर्ग करण्यात आले. दि.१२.१०.२००८ ते दि. १८.१०.२००८ या काळात पुण्यात राष्ट्रकुल युवा स्पर्धा असल्यामुळे नगर अभियंता खात्याकडील कर्मचारी वर्ग त्या कामात गर्क होता. श्री. टिंगरे यांनी पुन्हा पथ विभागाकडे अर्ज केला. तो पथ विभागाकडून विकास विभागाकडे पाठविण्यात आला व त्यानुसार श्री. टिंगरे यांना आवश्यक ती माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी संकपाळ, व सौ. हर्षदा वि. शिंदे व अपिलीय प्राधिकारी श्री. ना.न. बारापात्रे व श्री. अनिरूध्द पावस्कर यांनी लेखी निवेदन आयोगाला सादर केले. अपीलकर्ता श्री. टिंगरे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ला व सुनावणीलाही उपस्थित नव्हते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५ .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विजय चंद्रकांत लोहार
प्लॉट नं.८, प्रतापसिंह महाराज हौ.सोसायटी, रेणुकानगर,
गोडोली, सातारा - ४११५ ००१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,(सा.मं.)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित,
सातारा मंडल कार्यालय, कृष्णानगर, ता.जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित,
सातारा मंडल कार्यालय, कृष्णानगर, ता.जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | १७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विजय चंद्रकांत लोहार
प्लॉट नं.८, प्रतापसिंह महाराज हौ.सोसायटी, रेणुकानगर,
गोडोली, सातारा - ४११५ ००१

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,(सा.मं.)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित,
सातारा मंडल कार्यालय, कृष्णानगर, ता.जि. सातारा श्री. भोलाजी भिमराव पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित,
सातारा मंडल कार्यालय, कृष्णानगर, ता.जि. सातारा श्री. माधव रामराव कणसे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.११.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

श्री. मोहंमदफारुख मोहंमदयुसुफ, कार्यकारी अभियंता, वाई यांचे सर्व्हिस पुस्तकाचे प्रथम पान, त्यांनी कार्यालयास सादर केलेल्या बी.ई. चे प्रमाणपत्र, त्यांचा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जातीचा दाखला, जातीचे पडताळणी प्रमाणपत्र इ. अनुषंगिक माहिती

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्र[illegible] या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

श्री. मोहंमदफारुख मोहंमदयुसुफ, कार्यकारी अभियंता, वाई यांची शैक्षणिक पात्रता, जातीचे प्रमाणपत्र, सेवापुस्तकाचे प्रथम पान आदी माहिती आपल्याला विहित मुदतीत मिळाली नाही. राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यामुळे आपण अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., यांच्यापुढील प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहिलो नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. विजय चंद्रकांत लोहार यांनी केले.

श्री. मोहंमदफारुख मोहंमदयुसुफ हे कार्यकारी अभियंता असून माहिती त्यांच्या कक्षेतील असल्या[illegible] संबंधित माहितीसाठी अर्ज त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला. परंतु माहिती वैयक्तिक व खाजगी असल्याची सबब देऊन माहिती देण्याबाबत सूट मिळावी, असा अर्ज करुन त्यांनी माहिती नाकारली. तसे श्री. लोहार यांना कळविले. श्री. लोहार यांनी प्रथम अपील केलेले नसताना त्यांचा मूळ अर्ज अपील म्हणून दाखल करुन घेऊन सुनावणी मुक्रर केली. परंतु आपण राज्य माहिती आयोगाकडे अपील केले असल्यामुळे उपस्थित राहणार नसल्याचे त्यांनी कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री. मोहंमदफारुख मोहंमदयुसुफ हे मागासवर्गीय नाहीत. परंतु त्यांनी खोटी कागदपत्रे कार्यालयात दिली आहेत व त्या आधारे पदोन्नती आदी लाभ मिळविले आहेत, ते उघड होऊ नयेत, म्हणून माहिती दिली जात नाही, असे श्री. लोहार यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्री. लोहार यांनी मागितलेली माहिती अधिकाऱ्यांच्या संदर्भातील सार्वजनिक स्वरुपात उपलब्ध असलेली अशा स्वरुपात आहे. अशी माहिती गोपनीय अथवा खाजगी म्हणून नाकारता येणार नाही. तत्कालीन कार्यकारी अभियंता, वाई श्री. मोहंमदफारुख मोहंमदयुसुफ (सध्या पनवेल) यांनी १५ दिवसात ही माहिती सादर करावी व अपीलकर्त्यास ती देण्यात यावी. विद्‌यमान अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., यांची ही जबाबदारी राहिल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., श्री. भोलाजी भिमराव पाटील यांनी श्री. मोहंमदफारुख मोहंमदयुसुफ यांना दि. २१.८.२००८ च्या पत्रान्वये कळविले, व त्यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती श्री. लोहार यांना दि. १६.९.२००८ च्या पत्रान्वये पाठविल्याचा अहवाल संबंधित माहितीच्या प्रतींसह आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ .०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बिभिषण मारूती चव्हाण
गुडवील सत्यम सहकारी गृह रचना संस्था मर्यादित,
फ्लॅट नं.१०, दुसरा मजला, प्लॉट नं.१,
सर्व्हे नं.५५/१+६७/१ व २, गोकुळनगर, धानोरी, पुणे-१५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
झोन क्र.२, ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण कार्यालय, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७१ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. बिभिषण मारूती चव्हाण
गुडवील सत्यम सहकारी गृह रचना संस्था मर्यादित,
फ्लॅट नं.१०, दुसरा मजला, प्लॉट नं.१,
सर्व्हे नं.५५/१+६७/१ व २, गोकुळनगर, धानोरी, पुणे-१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
झोन क्र.२, ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. ज्ञानेश्वर मोळक

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण कार्यालय, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय,<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री.जीवन प्रतापराव पवार, सहाय्यक अभियंता | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मंजूर प्लॅनप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम व इतर सुविधा नसतील तर संबंधित आर्किटेक्ट व बिल्डर त्याला जबाबदार असल्याने त्यांना पत्र पाठवून सूचना देण्याच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती आपल्याला मिळाली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री. बिभिषण मारुती चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२५.२.२००९ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स अपीलकर्ता गैरहजर होते. त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

मंजूर आराखडयाप्रमाणे बांधकाम नसल्यास बिल्डर व आर्किटेक्ट जबाबदार आहेत. याबाबत प्रत्यक्ष पाहणी करुन दिलेला अहवाल, आर्किटेक्ट व बिल्डर यांनी दिलेले उत्तर आदी माहिती आपण तीन अर्जांद्वारे मागितली होती ती मिळाली नाही, असे निवेदन श्री. चव्हाण यांनी केले.

श्री. चव्हाण यांनी 'मंजूर आराखडयाप्रमाणे बांधकाम पूर्ण झालेले नसताना पुणे महानगरपालिकेकडून घेण्यात आलेल्या अंतिम भोगवटा प्रमाणपत्राबाबत' असे नमूद करुन तीन अर्जाद्वारे माहिती मागितली होती. त्यावर अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने नव्या अर्जाद्वारे त्यांनी माहिती मागितली. ती देण्यात आली आहे. या संदर्भात ते सातत्याने पत्रव्यवहार करीत असून यापूर्वी किमान पाच वेळा त्यांना उत्तर पाठविण्यात आले आहे, तसेच

नेमकी माहिती कोणती हवी याचीही विचारणा केलेली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. जीवन प्रतापराव पवार यांनी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे, परंतु आणखी तपशील हवा असल्यास निःशुल्क दयावा. संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्याव्यात व त्यानुसार आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. चव्हाण यांना दि. १३.८.२००९ रोजी संपूर्ण फाईल दाखवून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती मागणीप्रमाणे देण्यात आल्या, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दि.२४.८.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. मात्र आपल्याला दिलेली माहिती अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असे निवेदन श्री. चव्हाण यांनी दि. १६.८.२००९ रोजी आयोगाला सादर केले. त्यात अन्य अर्जातील माहितीच्या संदर्भातील आक्षेप नोंदविले आहेत. प्रस्तुत अपिलाबाबतचा आक्षेप त्यात नाही. तसेच हे आक्षेपही प्रामुख्याने प्रशासकीय कार्यवाहीबाबतचे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा विचार अंतर्भूत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २९.९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ, पु**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. अशोक जगदेवप्पा तमशेट्टी
फ्लॅट नं.२३, साईराज सहकारी गृहरचना संस्था मर्या.,
सर्वे नं.१४/१५/२/२, वडगाव बु., आनंदनगर, पुणे-५१ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** महाव्यवस्थापक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,
५८३-ब, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे -३७ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** व्यवस्थापक (आस्था.)
महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,
५८३-ब, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे -३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०९.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. अशोक जगदेवप्पा तमशेट्टी<br>फ्लॅट नं.२३, साईराज सहकारी गृहरचना संस्था मर्या.,<br>सर्वे नं.१४/१५/२/२, वडगाव बु., आनंदनगर, पुणे-५१<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक (आस्थापना) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,<br>५८३-ब, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे -३७ श्री. बी.ए.पाचघरे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक व्यवस्थापक (आस्था.) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,<br>५८३-ब, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे -३७ श्री. एस.बी. घाडगे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०६.०९.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०८.०९.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | -- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | १३.२.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br><br>महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, गुलटेकडी, पुणे वरील सध्या कार्यरत असलेल्या संचालकाची नावे, हुद्दा, पत्रव्यवहाराचा पत्ता, दूरध्वनी फॅक्स क्रमांक व ई मेल क्रमांक दि.३०.०४.२००१ ला झालेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीच्या अनुषंगाने अपील कमिटीच्या स्थापनेबाबतची माहिती सदर समितीचे अधिकार, तसेच सदर अपील समितीसमोर विचारार्थ झालेल्या अपीलावरील कामकाजाच्या वेळी उपस्थित संचालक, पदाधिकाऱ्यांची नावे व तदनुषंगिक अन्य माहिती |
|---|---|

## विवेचन

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने स्थापन केलेल्या अपील समितीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री. अशोक जगदेवप्पा तमशेट्टी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

यातील काही माहिती जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक (आस्था), महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांनी दिली. अपील समितीतील महत्त्वाच्या निर्णयांच्या माहिती दिली नाही व प्रकरण निकालात निघाल्याचे समजण्यात यावे, असे कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांसमवेत संयुक्त सहीने अपील निकाली काढले. दि. ३०.८.२००१ रोजी झालेल्या अपील समितीच्या बैठकीत आपल्या सेवाज्येष्ठता व बढती संदर्भातील अपिलाचा निर्णय काय झाला, याची माहिती आपल्याला अद्याप दिली नाही व सन १९९३-९४ पासन २००४-०५ पर्यंतच्या गोपनीय अहवालाच्या प्रतीही दिलेल्या नाहीत, असे प्रतिपादन श्री. तमशेट्टी यांनी केले.

श्री. तमशेट्टी यांच्या पत्राला तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले. प्रथम अपिलाच्या सुनावणीला श्री. तमशेट्टी उपस्थित राहिले नाहीत. याच माहितीच्या मागणीसाठी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अन्य एका अपिलाच्या सुनावणीच्या वेळीही श्री. तमशेट्टी गैरहजर होते. राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी त्यांचे अपील निकाली काढले. दि. २९.११.१९८४ च्या परिपत्रकाप्रमाणे घेतलेली विभागीय परीक्षेची गुणवत्ता यादी वीस वर्षापूर्वीची असल्यामुळे व उपलब्ध होत नसल्यामुळे देता आली नाही. दरम्यानच्या काळात काही माहिती दिली तसेच आयोगाने दि. १२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नंतर काही माहिती दिली. दरम्यानच्या काळात अधिकारी बदलत गेले. विद्यमान जन माहिती

अधिकारी तथा व्यवस्थापक (आस्था), महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे श्री. एम.बी. घाडगे हे डिसेंबर २००८ पासून व विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक (आस्था) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे श्री. बी.ए.पाचघरे हे दि. १५.११.२००८ पासून हे काम पाहत आहेत, असे या दोघांनी नमूद केले. राहिलेली सर्व माहिती उपलब्ध करून देण्यात येईल, असे निवेदन या दोघांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री. तमशेट्टी यांना विहित मुदतीत उत्तर देण्यात आले असले तरी माहिती देण्याबाबत त्या त्या वेळच्या अधिकाऱ्यांनी तत्परता दर्शविलेली नाही. काही वेळा कळविलेले शुल्क श्री. तमशेट्टी यांनी भरलेले नाही व शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल अशी भूमिका जन माहिती अधिकाऱ्यांनी घेतलेली दिसते. अपीलकर्त्याला कोणतेही शुल्क न आकारता संपूर्ण माहिती आता दिली गेली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य.

२. अपीलकर्ता श्री. अशोक जगदेवप्पा तमशेट्टी यांच्या गोपनीय अहवालाच्या प्रतींसह दि. ६.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे द्यावयाची राहिलेली (अभिलेखाच्या वर्गीकरणानुसार नाश करण्यात आलेल्या व्यतिरिक्तची ) सर्व माहिती दि. ३०.९.२००९ पर्यंत निःशुल्क द्यावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी श्री. एम.बी.घाडगे व अपिलीय प्राधिकारी श्री. बी.ए.पाचघरे यांची ही जबाबदारी राहील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
मु.पो.चाकण, विद्याधाम कॉलनी, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे — उत्तरवादी
पुणे ग्रामीण, पुणे
(१)**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
(२)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक,
चाकण पोलीस स्टेशन, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०+१२८४ / पुणे / २००७. |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.६.२००८, १६.७.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास दत्तात्रय बारवकर
मु.पो.चाकण, विद्याधाम कॉलनी, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे
पुणे ग्रामीण, पुणे प्रतिनिधी श्री.अशोक मोराळे
(१)**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण, पुणे श्री.अशोक मोराळे
(२)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक,
चाकण पोलीस स्टेशन, ता.खेड, जि.पुणे श्री.एस.डी.कोकाटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.८.२००६, २१.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.१२.२००६, २२.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.९.२००६, २५.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.११.२००६, १८.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत माहिती मागणीची छायांकित प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या संदर्भातील व माहितीच्या अधिकारातील कायद्याविषयीची सन २००१ पासूनची माहिती अपीलकर्ता श्री.विलास दत्तात्रय बारवकर यांनी मागितली होती. आपल्याला योग्य माहिती मिळाली नाही, अपूर्ण, खोटी, दिशाभूल करणारी व विलंबाने माहिती दिली. या कारणावरुन श्री.बारवकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

श्री.बारवकर यांचा दि.२१.४.२००७ चा अर्ज जन माहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना दि.२४.४.२००७ रोजी प्राप्त झाला व जन माहिती अधिकारी श्री.अशोक मोराळे यांनी दि.२२.५.२००७ रोजी माहिती दिली. त्याविरुध्द श्री.बारवकर यांनी केलेल्या अपिलाचा निर्णय श्री.मोराळे यांनीच अपिलीय प्राधिकारी म्हणून देऊन अपील निकाली काढले. श्री.बारवकर यांनी आपल्याला सर्व माहिती मिळाली असल्याचे व तक्रार राहिली नसल्याचे नमूद करुन स्वखुषीने अपील मागे घेतले. अन्य तक्रारींबाबत ते अर्ज देणार असून त्यांना योग्य न्याय हवा आहे, असे अपिलीय प्राधिकारी यांनी निकालपत्रात नमूद केले. मात्र माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आली व आपल्यावर दबाव आणून आश्वासन देऊन लिहून घेऊन अपील मागे घेण्यास भाग पाडले, असे श्री.बारवकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात म्हटले आहे.

आयोगाने दि.१२.६.२००८ व दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

**अपील क्र.२८०**

सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक, चाकण पोलीस स्टेशन यांनी माहिती विहित मुदतीत व योग्य दिली नाही, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणी घेण्याची टाळाटाळ करुन त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला, असे श्री.बारवकर यांनी नमूद केले आहे.

**अपील क्र.१२८४**

आपण माहिती मागितलेल्या १६ मुद्दयांपैकी ५ मुद्दयांची (१,२,४,५,६) माहिती अपूर्ण व ७ ते १२ या मुद्दयांची माहिती चुकीची दिल्याचे प्रतिपादन श्री.बारवकर यांनी केले. श्री.बारवकर यांना सर्व माहिती देण्यात आली आहे, कोणत्याही प्रकारचा दबाव त्यांच्यावर आणलेला नव्हता व त्यांनी स्वखुषीने अपील मागे घेत असल्याचे लिहून दिले, असे श्री.बारवकर यांच्या पत्रासह श्री.मोराळे यांनी नमूद केले. आपण माहिती मागत असल्यामुळे आपल्यावर हल्ला झाला, असा दावा श्री.बारवकर यानी केला. या आरोपाबाबत तपशील वा पुरावा त्यांनी सादर केला नाही. जन माहिती अधिकारी म्हणून श्री.मोराळे यांनी माहिती दिली व त्यांनीच अपील चालविले हे योग्य नव्हते, असा आक्षेप श्री.बारवकर यांनी नोंदविला. पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या आदेशानुसार आपण सुनावणी घेतली, असे श्री.मोराळे यांनी सांगितले. परंतु श्री.बारवकर यांचा आक्षेप रास्त असून याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनीच अपिलाची सुनावणी घेता कामा नये याची जाणीव आयोगाने श्री.अशोक मोराळे यांना दिली.

श्री.बारवकर यांनी जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांच्याकडे माहिती मागणीचा मूळ अर्ज केला होता. ही माहिती आपल्या अभिलेखावरील असल्याने त्यांनी हा अर्ज आपल्याकडे पाठवून दिला. माहिती खेड विभागाशी संबंधित असल्यामुळे आपण जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, खेड यांच्याकडे अर्ज वर्ग केला. त्यांनी समक्ष माहिती दिली, परंतु जाणूनबुजून त्रास

देण्याच्या हेतूने श्री.बारवकर सातत्याने अर्ज व अपिले करीत असतात, असे श्री.मोराळे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. दि.२९.९.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात माहितीच्या अनुषंगाने त्यांनी याचा पुनरुच्चार केला आहे.

श्री.बारवकर यांनी केलेला मूळ अर्ज योग्य जन माहिती अधिकाऱ्यांकडे केला नव्हता. त्यांच्या प्रथम अपिलाच्या अर्जासोबत छायांकित प्रत जोडलेली होती. त्यावरुन माहिती देण्याची सूचना जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड यांना देण्यात आली. तत्कालीन सहाय्यक माहिती अधिकारी श्री.अमर देसाई यांनी त्यांच्या ११ मुद्दयांची ५६५ पानी माहिती श्री.बारवकर यांना समक्ष दि.२७.१२.२००६ रोजी दिली. उलट श्री.बारवकर यांनी त्याचे शुल्क दि.१२.१.२००७ रोजी भरले, असेही श्री.मोराळे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्री.बारवकर यांना विहित मुदतीत जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले आहे. त्यांच्या अर्जातील अनेक मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद केलेल्या माहितीच्या व्याख्येत बसणारे नाहीत. (उदा.अपील क्र.१२८४ मधील-मु.क्र.१ व ४ चा शेवटचा भाग, मु.क्र.६,९ व ११ चा प्रारंभीचा भाग, मु.क्र.१२,१४ मधील शेवटचा भाग, मु.क्र.१५ व १६, अपील क्र.२८० मधील मु.क्र.२,३ चा शेवटचा भाग, मु.क्र.७,९,१०). तसेच अनेक मुद्दयांमध्ये कारणांची विचारणा केली आहे, ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ८ .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. आप्पाराव बसण्णाप्पा मनोरे
इंडियन रेडक्रॉस मजदूर संघ
संगम, सर्व्हे नं.१०/९अ, सेनापती चौक, दापोडी, पुणे-१२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
(भूसंपादन व व्यवस्थापन),
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
भूमी व जिंदगी, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८११ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त, (भूसंपादन व व्यवस्थापन), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सुधाकर तेलंग

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, भूमी व जिंदगी, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. चंद्रशेखर हंसलाल अकवारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>सोबत यादी जोडली आहे. | |

## विवेचन

रास्ता पेठ, पुणे येथे ५० वर्ष चालू असलेली इंडियन रेडक्रॉस सोसायटीची ब्लड बँक चालू करण्याच्या संदर्भात आपल्याला विलंबाने व चुकीची माहिती दिली जात आहे. मागणीनुसार दिलेली माहिती अपुरी आहे, त्यामुळे आपले समाधान झालेले नाही, म्हणून जन माहिती अधिकाऱ्यास शास्ती व्हावी, असे श्री. आप्पाराव बसवण्णाप्पा मनोरे यांनी दि.२५.९.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली. वैद्यकीय कारणामुळे श्री. मनोरे सुनावणीला उपस्थित नव्हते.

श्री. मनोरे यांना विहित मुदतीत उत्तर दिले आहे. त्यांनी केलेल्या अर्जानंतरच्या सर्व पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती त्यांना देण्याचा आदेश प्रथम अपिलाच्या निर्णयात देण्यात आला. त्यानुसार त्याही प्रती दिल्या, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री. चंद्रशेखर हंसलाल अकवारे व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, पुणे महानगरपालिका श्री. सुधाकर तेलंग यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. पुणे महानगरपालिकेशी केलेल्या कराराप्रमाणे इंडियन रेडक्रॉस सोसायटीने ब्लड बँक चालू करणे कायदेशीरदृष्ट्या आवश्यक असताना ती बंद आहे. ती चालू करण्याची कार्यवाही व्हावी, अशी मागणी श्री. मनोरे यांनी निवेदनांमध्ये नमूद केली आहे. ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची असून सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**पुणे.**

**दि.२५.९.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

प्रा. जिनकर भागवत माळी
सी-१, अनंतस्मृती सोसायटी, भारती विद्यापीठ परिसर,
स.नं.७४/१अ, कात्रज, पुणे-४६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. मदन रामचंद्र आढारी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. एस.एस.भोसरेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, गुंठेवारी विभाग, पुणे यांचे पत्र दि.९.७.२००४, विधी सल्लागार, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे दि. ७.९.२००४ चे पत्र व विकास अभियंता बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, यांचे पत्र दि. २०.५.२००६ चे पत्रांच्या प्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. जिनकर भागवत माळी यांनी गुंठेवारी प्रकरणी मागितलेली माहिती मान्य करुनही दिली जात नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता (बांधकाम नियंत्रण),पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे आपण माहिती मागितली होती. त्यांच्याकडून, तसेच अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, महानगरपालिका यांच्याकडूनही माहिती दिली गेली नाही. विधी सल्लागार कार्यालयाने आपल्याला माहिती दिली. मात्र नगर अभियंता कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. माळी यांनी केले.

श्री. माळी यांनी गुंठेवारी प्रस्तावातील माहिती बाबतचा अर्ज बांधकाम नियंत्रण विभागाकडे दि. ४.७.२००६ रोजी दिला. परंतु याबाबतची आवश्यक माहिती अन्य अर्जाद्वारे मिळाल्याची पोहच दि.३.६.२००६ रोजी दिली आहे. तथापि नवा अर्ज गुंठेवारी विभागाशी संबंधित असल्यामुळे क्षेत्रिय अधिकारी, टिळक रोड कार्यालय यानी अर्ज सहाय्यक अभियंता, गुंठेवारी विभाग यांच्याकडे वर्ग केला. श्री. माळी यांना हवी असलेली विधी सल्लागार खात्याच्या अभिप्रायाची प्रत गुंठेवारी विभागाकडे उपलब्ध नसल्याचे त्यांना कळविले. ही प्रत विधी सल्लागार विभागाकडे अर्ज करुन श्री. माळी यांनी प्राप्त करुन घेणे आवश्यक होते, अशी कल्पना त्यांना देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

वरील बाबी व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास योग्य त्या विभागाकडून माहिती देण्यात आलेली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२९.९.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीरंग आनंदा माने
भवानीनगर, हिंगणे रोड, वडूज, ता.खटाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा — उत्तरवादी
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव(वडूज), ता.खटाव, जि.सातारा
(१)**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, खटाव, जि.सातारा
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव(वडूज), ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८४+२८५/सातारा/२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१ .८.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीरंग आनंदा माने
भवानीनगर, हिंगणे रोड, वडूज, ता.खटाव, जि.सातारा
(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा श्री.सतीश या.भोसले
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खटाव(वडूज),
ता.खटाव, जि.सातारा श्री.व्ही.के.गडांकुश
(१)**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
खटाव, जि.सातारा श्री.सुधाकर रा.पाटील
(२)**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
खटाव(वडूज), ता.खटाव, जि.सातारा श्री.बी.एस.मोहिते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.१.२००८ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>नढवळ येथील फेरफार नं.१४०७ व आम्हा तिघा भावांचे (श्री.भिकू आनंदा, श्री.श्रीरंग आनंदा व श्री.विठ्ठल आनंदा माने)आपसात वाटप करण्यासाठी दिलेल्या अर्जाची छायांकित प्रत, तसेच झालेले जबाब, नोटिशीची प्रत. |
|---|---|

## विवेचन

जमिनीच्या फेरफाराची व त्यासोबत झालेले जाब जबाब, सन १९८३-८४ सालाचे ७/१२ उतारा अपीलकर्ता श्री.श्रीरंग आनंदा माने यांनी मागितले होते. जन माहिती अधिकाऱ्यांनी तहसीलदार यांच्याकडे अर्ज वर्ग केला. संबंधित माहिती नष्ट केली असल्याचे त्यांनी अपीलकर्ता श्री.श्रीरंग आनंदा माने यांना कळविले. आपल्याला माहिती मिळाली नाही, म्हणून श्री.माने यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

आपआपसात वाटप होऊन त्याप्रमाणे नोंद करण्याबाबत वर्दी अर्ज व कबुलीजबाब संबंधितांनी दिल्यावरुन नोंद केलेली आहे. ही कागदपत्रे क वर्गातील असलयामुळे तहसीलदार, खटाव यांच्याकडून नाश करण्यात आले आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खटाव यांनी कळविले होते, त्याचाच पुनरुच्चार त्यांनी सुनावणीत केला. या प्रकरणी न्यायालयात दावा चालू असून त्यासाठी आपल्याला ही माहिती आवश्यक असल्याचे प्रतिपादन श्री.माने यांनी केले. जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर स्वयंस्पष्ट आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. ए.एस.गणेशन
सेक्रेटरी, स्नेहशांती को.ऑप.हौ.सोसायटी,
८२, रास्ता पेठ,पुणे-४११ ०११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. ए.एस.गणेशन
सेक्रेटरी, स्नेहशांती को.ऑप.हौ.सोसायटी,
८२, रास्ता पेठ,पुणे-४११ ०११

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. प्रमोद शंकर निरभवणे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. सतिशचंद्र लक्ष्मण घुमे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** पाण्याच्या मीटरच्या फेब्रुवारी व मार्च २००१ मधील रिडिंग व १९९३ साली भरलेल्या रकमेचा परतावा या संदर्भातील माहिती | |

## विवेचन

पाण्याच्या मीटरच्या फेब्रुवारी व मार्च २००१ मधील रिडिंग व १९९३ साली भरलेल्या रकमेचा परतावा या संदर्भातील माहिती सातत्याने मागूनही आपल्याला दिली जात नाही. सन १९९३ पासून हा विषय आपण महापालिकेत विविध पातळ्यांवर मांडत असून त्याची दखल घेतली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. ए. एस. गणेशन यांनी केले.

मीटर सदोष असल्यामुळे रिडिंग उपलब्ध नव्हते. त्या काळातील बिल भरुन घेतले आहे व सोसायटीने पैसे भरण्याची तयारी लेखी पत्राद्वारे दर्शविली आहे. या संदर्भातील सर्व कागदपत्र श्री. गणेशन सचिव असलेल्या ‘स्नेहशांती गृहनिर्माण संस्थे’ला त्यावेळी देण्यात आली. तसे संस्थेने लेखी दिले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता श्री. सतिशचंद्र लक्ष्मण घुमे यांनी लेखी नमूद केले. श्री. गणेशन तेव्हा संस्थेचे सचिव होते व आताही संस्थेचे सचिव आहेत. भरलेल्या रकमेचा परतावा देय नसल्याचे त्यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

श्री. गणेशन यांना माहिती देण्यात आली आहे. रकमेचा परतावा मिळणे - न मिळणे ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि मूळ मीटर रिडिंगचा तपशील उपलब्ध नसल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी

अभियंता यांनी श्री. गणेशन यांची मूळ तक्रार समजून घेऊन त्या विषयीच्या कार्यवाहीची माहिती श्री. गणेशन यांना द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नारायण बाबुराव सुतार
१००५/३, राजेंद्रनगर, शिवगौरी सोसायटी,
पुणे- ४११ ०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा ज्युनिअर लिगल ॲसिस्टंट,
विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ज्युनिअर लिगल ॲसिस्टंट,
विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |
| **३** | **उपस्थित -**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. नारायण बाबुराव सुतार<br>१००५/३, राजेंद्रनगर, शिवगौरी सोसायटी, पुणे- ४११ ०३०<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ज्युनिअर लिगल ॲसिस्टंट, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ॲड. मंजुषा इधाटे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे महानगरपालिकेने मौजे गुलटेकडी येथील प्लॉटच्या संदर्भात जिल्हा न्यायालयाच्या निकालाविरुध्द सन १९९८-९९ मध्ये दाखल केलेल्या अपिलामधील सेकंड अपिल मधील सिव्हील ॲप्लीकेशनची प्रत आपण मागितली होती. क्रमांक न टाकता ही प्रत मिळाली. आपण अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे क्रमांक टाकून प्रत मिळावी, या मागणीसाठी अपीलकर्ता श्री. नारायण बाबुराव सुतार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

पुणे महानगरपालिकेची मालमत्ता जप्त करुन लिलाव करण्याचा हुकूम न्यायालयाने दिला होता, त्याची प्रत आपल्याला मिळाली नाही. दुसऱ्या अपिलातील सिव्हील ॲप्लिकेशनवर नंबर टाकून दिला जात नाही, याचा अर्थ प्रतिज्ञापत्र तयार झाले,पण दाखल केले नाही असा होतो, असे प्रतिपादन श्री. सुतार यांनी केले. मात्र श्री. सुतार यांनी विधी सल्लागार कार्यालयाकडे अर्ज केल्यानंतर तो उपायुक्त (भूमी व जिंदगी ),पुणे महानगरपालिका यांच्याकडे पाठविण्यात आला. त्यांनी सेकंड अपील मधील सिव्हिल ॲप्लीकेशनची प्रत उपलब्ध करुन दिली. त्यावर क्रमांक नाही, तीच प्रत श्री. सुतार यांना देण्यात आली. मूळ कागदपत्रांत क्रमांक तेथे नमूद नसताना तो नमूद करुन प्रत देणे शक्य होणार नाही, असे श्री. सुतार यांना कळविले. स्वतंत्रपणे क्रमांकही कळविला,असे जन माहिती अधिकारी यांनी प्रतिपादन केले.

मूळ कागदपत्रात अतिरिक्त नोंदी करुन प्रत देता येणार नाही, हे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे रास्त आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास मूळ संचिकेचे अवलोकन करुन आवश्यक असलेल्या प्रती घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नारायण बाबुराव सुतार
१००५/३, राजेंद्रनगर, शिवगौरी सोसायटी,
पुणे-४११ ०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त कार्यालय क्र.३,
टिळक रोड, पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, उप आयुक्त कार्यालय क्र.३,
टिळक रोड, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नारायण बाबुराव सुतार
१००५/३, राजेंद्रनगर, शिवगौरी सोसायटी,
पुणे-४११ ०३०

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, उप आयुक्त कार्यालय क्र.३,
टिळक रोड, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सतिश भोसरेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.१.२००९ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
| | सोबत छायांकित प्रत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्त्यास विषयांकित प्रकरणाची सर्व कागदपत्रे दाखविण्यात आली. एका मुद्दयाच्या माहितीबाबत त्यांचे समाधान झाले नसून त्याबाबतची माहिती आठ दिवसांत देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले. त्यानुसार माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका श्री. सतीश भोसरेकर यांनी केले. विशिष्ट पध्दतीने आपल्याला उत्तर हवे होते, ते दिलेले नाही, असे प्रतिपादन श्री. सुतार यांनी केले. मात्र मूळ मुद्यानुसार माहिती दिल्यानंतर अशा प्रकारची अपेक्षा करता येणार नाही. अपीलकर्त्यास माहिती दिल्याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी पूरक प्रतींसह सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. २१.३.२००९ रोजी श्री. सुतार यांना दिलेल्या माहितीच्या प्रतीसह पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी श्री. भोसरेकर यांनी दि. ३०.९.२००९ रोजी आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

पुणे
दि. २५.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रल्हाद साहेबराव उर्फ रामराव जाधव
मु.पो.अतीत, ता.जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
अति उच्च दाब तारमार्ग बांधकाम विभाग ९२५, कसबा पेठ,
जुना बाजारपेठ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.८.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रल्हाद साहेबराव उर्फ रामराव जाधव
मु.पो.अतीत, ता.जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
अति उच्च दाब तारमार्ग बांधकाम विभाग ९२५, कसबा पेठ,
जुना बाजारपेठ, पुणे श्री.प्र.श्री.सिंदखेडकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.८.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सन १९९२ ते १९९५ मध्ये मौजे अतीत, ता.सातारा गट नं.९२३ मधील क्रमांक सी २०१ टॉवर ४०० के.व्ही.ची नुकसान भरपाई श्री.बाबुराव कृष्णा जाधव यांना देण्यात आली. त्याचा चेक क्रमांक, दिनांक व रक्कम याचा दाखला. सध्या याबाबतचे ऑफिस रेकॉर्ड कराड येथील कार्यालय बंद झाल्यामुळे लोणीकंद येथे सबस्टेशनमध्ये सर्व ऑफिस हलविण्यात आले आहे. | |

## विवेचन

सन १९९२ ते १९९५ मध्ये ४०० के.व्ही.च्या टॉवरबाबतची नुकसानभरपाई दिल्याच्या धनादेशाच्या क्रमांकासह दाखला मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.प्रल्हाद साहेबराव ऊर्फ रामराव जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांच्याकडे केली होती. या माहितीचा संपूर्ण शोध घेऊन अभिलेख तपासूनही तपशील न मिळाल्याचे श्री.जाधव यांनी कळविले. संबंधित धनादेशाचा क्रमांक आदी माहितीसाठी बँकेतही संपर्क साधला, परंतु बँकेकडूनही तपशील मिळाला नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट केले. परंतु कागदपत्रे कार्यकारी अभियंता, अति उच्च दाब तारमार्ग बांधकाम, विभाग ९१२५, कसबा पेठ, जुना बाजारपेठ, पुणे या कार्यालयात उपलब्ध आहेत, असे नमूद करुन श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

लेखी निवेदनातील मुद्दयांचाच पुनरुच्चार श्री.जाधव यांनी आयोगापुढील सुनावणीत केला. श्री.बाबुराव कृष्णा जाधव, अतीत, जि.सातारा यांना दिलेल्या नुकसानभरपाईच्या संदर्भातील ही माहिती आहे. दहा वर्षांपूर्वीची ही कागदपत्रे आहेत. कराड येथील तारमार्ग बांधकाम विभाग दि.३१.१.२००२ रोजी बंद झाला. तेथील कामकाज महाराष्ट्र राज्य वीज मंडळ ४०० के.व्ही.तारमार्ग

बांधकाम व परिवहन विभाग, पुणे यांच्याकडे सुपूर्त केले. हे कार्यालय दि.३०.९.२००४ रोजी बंद झाले. अपीलकर्त्याने प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन अभिलेखाचा शोध घेऊनही माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. हे अभिलेख दहा वर्षांपूर्वीचे असल्याने वर्गवारीनुसार नष्ट करण्यात आले आहेत, असे अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२१.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

१. श्री. दादा गुलाब देशमुख (पत्रकार) अपीलकर्ता
२. श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे (पत्रकार)
रा. लोणी खुर्द, ता. राहाता, जि.अहमदनगर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, पुणे-११

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता
नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८८२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १९.६.२००९ |

४ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, पुणे-११ तर्फे प्रतिनिधी
श्री. भा.रा.बोकडे, सहाय्यक अधीक्षक अभियंता

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि.सातारा श्री. दि. आ.पांढरे

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत जोडलेल्या छायांकित प्रतीनुसार

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दादा गुलाब देशमुख (पत्रकार) व श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे (पत्रकार) यांनी नीरा पाटबंधारे विभाग, फलटण, जि. सातारा या विभागाला मिळालेला निधी, झालेली कामे, याची दि. १.४.२००७ ते ३१.६.०८ या कालावधीतील माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल असल्याच्या कारणावरून आपण अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, पुणे यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी सुनावणीच्या वेळेला उपस्थित नसताना अपील न चालविता सुनावणीचे खोटे आदेश देण्यात आले, म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई करावी, या मागणीसाठी श्री शिंदे व देशमुख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. २६.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे गैरहजर होते व अपीलकर्ता उपस्थित होते. सुनावणी घेण्यात यावी, अशी विनंती त्यांनी प्रपत्रात नोंदविली. आयोगाने दि. १९.६.२००९ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणीस अपीलकर्ता स्वतः उपस्थित नव्हते, त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

चार मुद्दयांची माहिती मिळाली नाही, शुल्क भरल्यानंतर काही माहिती मिळाली, व प्रथम अपिलांनतर १० दिवस उशिरा काही माहिती मिळाली, असे निवेदन अपीलकर्त्यांच्या प्रतिनिधीने केले. श्री. देशमुख व शिंदे यांचा अर्ज दि.१४.७.२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय कार्यालय व शाखा स्तरावरील माहिती द्यावी लागणार असल्यामुळे आढावा घेऊन दि.२५.७.२००८ रोजी शुल्क कळविण्यात आले. शुल्काबाबतच्या मुद्देनिहाय कागदपत्रांच्या तपशिलाची मागणी अपीलकर्त्यांनी दि. ४.८.२००८ रोजी केली. मुद्देनिहाय, पृष्ठनिहाय सूची त्यांना दि. १२.८.०८ रोजी कळविण्यात आली. दि. २६.८.२००८ रोजी त्यांच्याकडून शुल्काची रक्कम प्राप्त झाल्यानंतर दि.२८.८.०८ रोजी माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आली. दि.१९.१.२००९ रोजीच्या सुनावणीमध्ये अपीलकर्त्यांनी जन माहिती अधिका-यांकडून सर्व माहिती प्राप्त झाल्याचे सांगितले, असे अपिलाच्या निर्णयात नमूद केले आहे. पाच मुद्दयांची माहिती पूर्वी दिलेली होती. परंतु अपीलकर्त्यांनी दिलेल्या नमुन्यामध्ये अपीलकर्त्यांना ती हवी असल्यामुळे पुन्हा त्या स्वरुपात द्यावी, असा निर्णय अपिलात

झाला व त्यानुसार ५४ पृष्ठांची माहिती रजिस्टर पोस्टाने नि:शुल्क पाठविण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. दि. आ. पांढरे व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. भा. रा. बोकडे यांनी केले.

अपिलीय प्राधिकाऱ्यांना तातडीच्या बैठकीसाठी मुंबईला जावे लागल्यामुळे त्यांच्या आदेशानुसार आपण अपीलकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेतले, व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या वतीने निर्णय दिला, असे प्रतिपादन सहायक अधीक्षक अभियंता श्री. भा. रा. बोकडे यांनी केले. या प्रकारे सुनावणी घेणे योग्य नाही. अपिलीय प्राधिकारी यांनी स्वत: सुनावणी घेतली पाहिजे, याची समज अपिलीय प्राधिकारी, श्री. अ.वा. सुर्वे यांना देण्यात येत आहे.

दिलेली माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी व खोटी असल्याचे अपीलकर्त्यांनी विविध निवेदनांमध्ये व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले असले तरी त्याबाबतचे कोणतेही पुरावे त्यांनी सादर केलेले नाहीत. दिलेल्या माहितीच्या प्रतीसह जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार जन माहिती अधिकारी श्री. पांढरे यांनी दि. २४.६.२००९ रोजी सविस्तर अहवाल सादर केला. श्री. देशमुख व शिंदे यांनी विस्तृत व अनेक विषयांबाबतची माहिती मागितली होती, ती विहित मुदतीत त्यांना देण्यात आली आहे. त्याबाबत त्यांना काही शंका असतील तर अभिलेख विनामूल्य निरीक्षणासाठी उपलब्ध करून दिले जातील, असे या अहवालात श्री. पांढरे यांनी नमूद केले आहे. अपीलकर्त्यांना आवश्यक तर असे निरीक्षण ते करू शकतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ८.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. मधुकर मारूतीराव पंडित
कृष्णा अपार्टमेंट, फ्लॅट नं.२, डीएड कॉलेजजवळ,
फलटण, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सदर बाझार सातारा, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सदर बाझार सातारा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९५/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. मधुकर मारूतीराव पंडित
कृष्णा अपार्टमेंट, फ्लॅट नं.२, डीएड कॉलेजजवळ,
फलटण, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सदर बाझार सातारा, जि. सातारा श्री. एस.डी. आटोळे

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सदर बाझार सातारा, जि. सातारा सौ. उर्मिला कां. पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.९.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत प्रत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

फलटण शहरातील रिक्षा व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील दलाल आदी संबंधातील ११ मुद्दयांची माहिती आपण मागितली होती. विहित मुदतीनंतर प्रथम अपील केल्यानंतर शुल्क भरण्याबाबतचे पत्र आपल्याला मिळाले. प्रथम अपिलाच्या सुनावणीचे पत्र उशिरा मिळाल्याने आपण उपस्थित राहू शकलो नाही. परंतु अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा श्री. एस.डी. आटोळे यांनी आपण उपस्थित नसल्याच्या कारणावरुन अपील निकाली काढले. त्याबाबत समक्ष चर्चा करुन, स्मरणपत्र देऊनही माहिती मिळाली नाही. या कारणावरुन अपीलकर्ता श्री. मधुकर मारूतीराव पंडित यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. आपल्याला सविस्तर निवेदन सादर करावयाचे असल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील करावयास विलंब झाला, असे त्यांनी सादर केलेल्या तीन पानी निवेदनात म्हटले आहे.

दि.२२.८.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

श्री. पंडित यांनी मागितलेली माहिती सन १९८० ते २००७ या कालावधीतील होती. त्यासाठी जवळजवळ पन्नास हजार वाहनांचे अभिलेख पाहणे आवश्यक होते. कार्यालयातील सहा पैकी चार कार्यासनाकंडून माहिती तयार करावयाची होती. तसेच कार्यालयातील एकूण पंचवीस लिपिक वर्गीय पदापैकी १३ पदे रिक्त होती. एकच कर्मचारी हे काम करीत होता. या पार्श्वभूमीवर श्री. पंडित यांना विहित मुदतीतच शुल्काबाबत कळविण्यात आले. त्यांचा अर्ज दि.३०.७.२००७ चा असून तो ३१.७.२००७ रोजी प्राप्त झाला. दि. ३०.८.०७ रोजी त्यांना पत्र पाठविले. त्यापूर्वीच २९.७.०७ रोजी त्यांनी प्रथम अपील केले होते. शुल्क न भरल्यामुळे त्यांना माहिती देण्यात आली नाही, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा सौ. उर्मिला पवार यांनी लेखी निवेदनाद्वारे व प्रपत्रात केले. आयोगाने सुनावणी घेऊनच निर्णय व्हावा, असे श्री. पंडित यांनी प्रपत्रात नमूद केले.

अपिलीय प्राधिकारी श्री. आटोळे यांनी आपल्याला चर्चेसाठी बोलावले होते. तसेच अपील नाकारले असले तरी नंतर येऊन आपले म्हणणे सादर करु शकता, असेही सांगितले होते. परंतु नंतरही त्यांनी आपल्या अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार श्री. पंडित यांनी केली.

श्री. पंडित यांनी मागितलेली माहिती २७ वर्षांच्या काळातील व संकलनासाठी विस्तृत अभिलेखाचे अवलोकन करावे लागेल अशी आहे. त्यांच्या अर्जातील अनेक मुद्दे स्वतः भाष्य करुन त्यावर अभिप्राय मागणारे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' या व्याखेत बसणारे नाहीत. तसेच फलटण शहरात रिक्षाने टेरीफप्रमाणे भाडे आकारणी करावी, सर्वच ठिकाणची अवैध प्रवासी वाहतूक बंद करावी, अनधिकृत / बेकायदेशीर एंजट यांचा सुळसुळाट बंद करावा, अशा मागण्या त्यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात केल्या आहेत. हाही भाग प्रशासकीय कार्यवाहीचा असून 'माहिती' ठरत नाही. अशा प्रकारची विचारणा माहितीच्या अधिकारात करणे अपेक्षित व योग्य नाही. श्री. पंडित यांनी सादर केलेल्या कागदपत्रांमधील भाष्य व आरोप याची माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दखल घेणे आवश्यक नाही. तरीही त्यांच्या मुद्दयांवरील देय माहिती निःशुल्क देण्याचा आदेश आयोगाने दिला. त्यानुसार त्याच दिवशी दि.२२.८.२००८ रोजी श्री. पंडित यांना माहिती दिल्याची व त्यांची पोहोच असल्याची प्रत जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा सौ. उर्मिला का.पवार व अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा श्री. एस.डी. आटोळे यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२५.९.२००९**